| | |
|---|---|
| | **म.सं.कौ. हि. का. अर्ज क्र. ०५/२०२१ मधील नि.क्र.०५ वरील आदेश**<br>**जयश्री – वि.– अविनाश व इतर**<br>(आदेश पारीत दिनांक – २९.०४.२०२६)<br>CNR No.MHLA060004262021 |

अर्जदार हिने सदरचा अर्ज गैरअर्जदार यांच्याविरुध्द कलम १२ व कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ अन्वये दाखल केला

०२. अभिलेखाचे काळजीपुर्वक विवेचन केले. अर्जदाराचा व दोन्ही वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची कायदेशीर पत्नी असून अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ चा विवाह त्यांचेतील हिंदु जाती रुढी रिवाजाप्रमाणे दिनांक ०६/०५/२०१९ रोजी लग्न झाले. सदर विवाह बंधनातुन अर्जदाराला एक मुलगा आहे.

०४. लग्न झाल्यापासुन लहानसहान गोष्टीवरुन गैरअर्जदार अर्जदाराशी वाद घालत होते आणि परस्त्री सोबत संबंध ठेवत असत. अर्जदाराला जाणुनबुजुन पांढऱ्या पायाची आहेस व तुझी आई चांगल्या खानदानाची आहे काय असे टोमणे देऊन बोलत असे व तिला शारिरीक व मानसिक त्रास देत असे.

०५. अर्जदाराची सासु स्वंयपाक येत नाही म्हणुन अर्जदाराला मारहाण करत असे. सासुचे ऐकुन गैरअर्जदार अर्जदाराला अश्लील शिवीगाळ व मारहाण करत असे. अर्जदाराची सासु अर्जदाराला आमचा नातु आदर्श हा आम्हाला देऊन टाक व तु तुझ्या नवऱ्यापासुन फारकत दे असे म्हणत असे. अर्जदार बाळांतपणाला गेल्यानंतर तिला कोणीही परत नांदावायला सासरी आणले नाही. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदाराने तिच्या अन्न वस्त्र आणि वैद्यकिय उपचाराची सोय केलेली नाही.

०६. गैरअर्जदार हा सरकारी रुग्णालयात पहारेकरी म्हणुन काम करतो व त्याला दरमहा बारा हजार रुपये पगार आहे. तसेच एकत्र कुटुंबाची साडेतीन एकर जमीन आहे. त्यातुन त्याला दरवर्षी पाच लाखाचे उत्पन्न होते. तसेच बौध्दवाडा येथे एक घर आहे. ज्याचे दरमहिना भाडे दहा हजार रुपये मिळते. गैरअर्जदार दरमहिना एकुण २० ते ३० हजार रुपये कमवतो. तरीही अर्जदाराला दरमहिना तिच्या व तिच्या मुलांच्या उदरनिर्वाहासाठी दरमहा पंधरा हजार रुपये मिळावे अशी मागणी केली आहे.

०७. नि. १९ कडे गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जदाराची सर्व म्हणणे नाकारले आहे. गैरअर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार ही प्रस्तुती

पुर्व घरातुन चार महिने आधी स्वखुशीने माहेरी गेलेली आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराला सतत मानसिक त्रास देऊन नांदावयास येण्यासाठी नकार देत होती म्हणुन गैरअर्जदार क्र. १ याने गंगाखेड येथील न्यायालयात दिनांक १३/०१/२०२१ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठविली.

०८. तसेच हिंदु विवाह कायदा कलम ९ अंतर्गत एच.एम.पी. क्र. २५/२०२१ ही केस गंगाखेड येथील न्यायालयात प्रलंबित आहे. तेथे अर्जदाराने अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केलेला आहे. आज रोजी देखील गैरअर्जदार हा त्याच्या पत्नीला नांदवायला तयार आहे.

०९. गैरअर्जदाराने त्याच्या कथनाच्या पुष्ठार्थ एच.एम.पी. क्र. २५/२०२१ ची सही शिक्याची प्रत दाखल केली आहे. सदरचा अर्ज गैरअर्जदाराने अर्जदाराविरुध्द गंगाखेड येथील न्यायालयात हिंदु विवाह कायदा कलम ९ अंतर्गत दाखल केलेला दिसुन येतो. सदर खटल्यामध्ये अर्जदाराने तिचे म्हणणे दाखल केलेले आहे. सदर खटल्यात अर्जदाराला दर महिना रक्कम रुपये ३०००/- अशी अंतरिम पोटगी मंजुर झालेली दिसुन येते.

१०. तसेच म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. २६/२०२५ हा कंधार न्यायालयात दाखल केलेला दिसुन येते. तसेच सदरचा अर्ज दिनांक २०/०८/२०२५ रोजी अर्जदाराने मागे घेतलेला दिसुन येतो.

११. गैरअर्जदाराच्या लेखी जबाबामध्ये तो सरकारी दवाखान्यात काम करतो किंवा त्याला शेतीच्या उत्पन्नातून दरवर्षी पाच लाख रुपये उत्पन्न येते हे कुठेही अमान्य केलेले नाही. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार हा दरमहिना साधारण विस ते तिस हजार रुपये कमावतो.

१२. अर्जदाराने तिच्या कथनाच्या पुष्ठार्थ कोणतेही सातबारा उताऱ्याची प्रत तसेच एकुण उत्पन्नाबाबतचे कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही फक्त गैरअर्जदाराने त्याच्या उत्पन्नाची बाब अमान्य केलेली नाही. यावरुन प्रथमदर्शनी गैरअर्जदार हा दरमहा वीस ते तीस हजार रुपये कमवतो असे दिसुन येते.

१३. सदरच्या अर्जाकरीता इतर गैरअर्जदारांना पोटगी मिळण्याकरीता गृहीत धरता येणार नाही. तसेच, इतर गैरअर्जदारांचे उत्पन्न देखील अर्जदारास मिळणाऱ्या पोटगीस ग्राह्य धरता येणार नाही. अर्जदार व गैरअर्जदाराचे लग्न अजुनही अस्तीत्वात आहे. करीता अर्जदाराचे पालन पोषण करणे ही गैरअर्जदाराची नैतीक जबाबदारी आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास पोटगी देण्यास बांधील आहे.

१४. सदरचा अर्ज हा अत्यंत प्रारंभीक टप्प्यावर आहे. मुळ अर्ज निकाली काढण्यास वेळ लागु शकतो. करीता अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान, गैरअर्जदाराची आर्थिक क्षमता व

सध्याची महागाई बघता, तसेच अर्जदाराला हिंदु विवाह कायदा कलम ९ अंतर्गत गंगाखेड येथील न्यायालयात गैरअर्जदाराकडुन रक्कम रु. ३०००/- पोटगी मंजुर झालेली आहे. सबब अर्जदारास खालीलप्रमाणे दरमहा अंतरिम पोटगी देणे न्यायहिताचे होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः-

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.०१ याने अर्जदाराला व तिच्या मुलाला मिळुन महिन्याकाठी रक्कम रुपये ४,०००/- (चार हजार रुपये) एवढी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.04.29 16:32:59 +0530

ठिकाण : अहमदपूर.
दिनांक : २९.०४.२०२६.

(एम.सी. हासगे)
२ रे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
(कोर्ट क्र.०२, अहमदपूर).